# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०१/०५/२०२६ (शुक्रवार )**

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील १ अधिकारी आणि ५ अंमलदार यांना उल्लेखनिय कामगिरी करीता मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे सन्मानचिन्ह जाहीर

नागपुर ग्रामीण जिल्हयाच्या आस्थापनेवरील १ पोलीस अधिकारी आणि ५ पोलीस अंमलदार यांना **पोलीस खात्यातील त्यांच्या उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी साठी अतिशय मानाचे मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे.** आज दिनांक ०१/०५/२०२६ रोजी महाराष्ट्र दिनी विभागिय आयुक्त कार्यालय, नागपुर येथे महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्हयाचे पालकमंत्री मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते सदर सन्मानचिन्ह प्राप्त नागपूर ग्रामीण जिल्हयाच्या आस्थापनेवरील **१) श्री. रमेश सुदाम बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, २) श्री. कृष्णकुमार अवधेशनारायण पांडे, सहा.पोलीस उपिनिरीक्षक – यंत्रचालक, बिनतारी संदेश विभाग ३) श्री अरूण काशीनाथ जयसिंगपुरे, सहा पोलीस उपनिरीक्षक, नेम. पोस्टे एमआयडीसी बोरी ४) श्री ज्ञानेश्वर कवडुजी राउत, सहा पोलीस निरीक्षक, नेम. पोस्टे एमआयडीसी बोरी ५) श्री महेंद्र रामाजी केसरे, पोलीस हवालदार, जिल्हा विशेष शाखा, नागपुर ग्रामीण आणि ६) श्री राधेश्याम वामनराव कांबळे, पोलीस हवालदार, पोलीस स्टेशन उमरेड यांना** पुष्पगुच्छ देवुन सन्मानित करण्यात आले. तसेच सिव्हील लाईन येथील पोलीस भवन, नागपुर येथे ध्वजारोहण समारंभादरम्यान मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या हस्ते वरील नमुद अधिकारी आणि अंमलदार यांना सन्मानित करण्यात आले.

**मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधीक्षक आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांनी वर नमुद अधिकारी आणि अंमलदार यांना शुभेच्छा दिल्या.**















## नागपूर ग्रामीण जिल्हयात पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांच्या पाल्यांसाठी विशेष रोजगार व अप्रेंटिसशिप मेळावा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडला

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दल यांनी वैभव एंटरप्रायझेस, नागपूर आणि प्रथम एज्युकेश फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नागपुर ग्रामीण जिल्हयातील पोलीस अधिकारी व अंमलदाराच्या मुला—मुलींसाठी आयोजित करण्यात आलेला रोजगार व अप्रेंटिसशिप मेळावा यशस्वीरित्या पार पडला.

या उपक्रमांतर्गत दिनांक ०९/०४/२०२६ ते दिनांक २३/०४/२०२६ रोजी दरम्यान नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला पदवीधर, १० वी ते १२ वी उत्तीर्ण/अनुत्तीर्ण, आयटीआय सर्व ट्रेड, कोणतेही डिप्लोमा धारक पोलीस पाल्य आणि इतर

उमेदवारांसाठी रोजगार मेळावा भरविण्यात आला होता. यामध्ये नागपूर जिल्ह्यातील विविध नामांकित कंपन्यांमध्ये नि:शुल्क रोजगार व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. या मेळाव्यास पात्र उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सदर मेळाव्यातून ८० उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली असून, पुढील प्रक्रियेनंतर त्यांना संबंधित कंपन्यांमध्ये रोजगार/अप्रेंटिसशिपची संधी मिळणार आहे.

हा उपक्रम पोलीस कुटुंबीयांसाठी अत्यंत लाभदायक ठरला असून, त्यांच्या पाल्यांच्या उज्ज्वल करिअर व रोजगाराच्या संधींसाठी नवे मार्ग उपलब्ध झाले आहेत.

## घरफोडीचे १२ गुन्हे उघड, १ आरोपी अटक,
## १७ लाख ९० हजार ६३ रूपयाचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक ३०/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभागात उघड न झालेल्या गुन्हयांचा तपासासंदर्भात पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदाराने माहीती दिली की, नरेंद्र नगर, नागपूर येथे राहणाऱ्या संकेत गेडाम याने घरफोडीचे अनेक गुन्हे केले आहे. अशी माहीती प्राप्त होताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्गदर्शनात दिनांक ३०/०४/२०२६ रोजी तांत्रिक पुरावे व गोपनिय माहितीच्या आधारे नमुद आरोपीचा नागपुर शहरात शोध घेतला आरोपी नामे **संकेत ईश्वर गेडाम, वय २८ वर्ष, रा. रागीट ले आउट, मराठा बारचे मागे, नागमंदीर जवळ वाघोडा, सावनेर, ह. मु. नरेन्द्र नगर, ,श्रीनगर, मानेवाडा रिंग रोड, एनआयटी ग्राउंड जवळ, नागपुर** यास नागपुर शहरातुन ॲक्टीव्हा मोपेड वाहनासह ताब्यात घेतले. त्याला ताब्यात घेवुन त्याचे जवळील मोपेड वाहनाबाबत विचारपुस केली असता त्याने सदर वाहन सावनेर डब्ल्यु सी एल कॉलनी परिसरातुन चोरी करून आणल्याचे सांगितले. पोलीसांनी त्याला कसुन विचारपुस करून त्याचे जवळील दुचाकी वाहनाची पंचासमक्ष झडती घेतली असता वाहनाचे डिक्की मध्ये एका थैली मध्ये सोन्याचांदीचे दागीने मिळुन आले. नमुद आरोपीने पोलीस स्टेशन सावनेर, खापा, कळमेश्वर, कोंढाळी, बोरी, देवलापार परिसरात घरफोडी केल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.

पोलीसांनी पंचासमक्ष विना क्रमांकाची ॲक्टीव्हा दुचाकी वाहन आणि सोन्याचांदीचा ऐवज असा एकुण १७,९०,०६३/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे.

**उघडकीस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे आहे.**

१) पोस्टे सावनेर अप.क्र. ४३७/२६ कलम ३३१(४),३०५(अ) भा.न्या.स.
२) पोस्टे सावनेर अप.क्र. ३२७/२६ कलम ३३१(४),३०५(अ) भा.न्या.स.
३) पोस्टे सावनेर अप.क्र. ३४७/२६ कलम ३३१(३),३३१(४),३०५(अ) भा.न्या.स.
४) पोस्टे सावनेर अप.क्र. ३१८/२६ कलम ३३१(४),३०५(अ) भा.न्या.स.
५) पोस्टे खापा अप.क्र.२२९/२६ कलम ३३१(४),३०५ भा.न्या.स.
६) पोस्टे कळमेश्वर अप.क्र.४२३/२६ कलम ३३१(३),३३१(४),३०५(अ) भा.न्या.स.
७) पोस्टे कळमेश्वर अप.क्र. ३०७/२६ कलम ३३१(४),३०५(अ) भा.न्या.स.
८) पोस्टे कळमेश्वर अप.क्र.४२४/२६ कलम ३३१(३),३३१(४),३०५(अ) भा.न्या.स.
९) पोस्टे कोंढाळी अप.क्र.२३१/२६ कलम ३३१(४),३०५(अ) भा.न्या.स.
१०) पोस्टे कोंढाळी अप.क्र.२२९/२६ कलम ३३१(४),३०५(अ) भा.न्या.स.
११) पोस्टे बोरी येथे अप.क्र.२६०/२६ कलम ३३१(३),३०५ भा.न्या.सं.
१२) पोस्टे देवलापार येथे अप.क्र.१४१/२६ कलम ३३१(४),३०५ भा.न्या.स.

**असे एकुण १२ गुन्हे उघड झाले आहे.**




**विविध गुन्हयातील जप्त मुद्देमाल**



गुन्हे उघडकीस आणणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

## पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत
## सावंगी रोड वरील ए. पी. लॉज मध्ये वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यांवर गुन्हा नोंद, एका पिडीतेची सुटका, दोन आरोपी अटक
## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण आणि कळमेश्वर पोलीस यांची संयुक्त कामगिरी


**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** दिनांक ३०/०४/२०२६ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण यांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत सावंगी रोड लगत असलेल्या ए. पी. लॉज मध्ये महीलांना पैश्याचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून रूम उपलब्ध करून देवून देहव्यापार करून घेत आहे. नमुद पथकाने सदर माहीती कळमेश्वर पोलीसांना देत कळमेश्वर पोलीसांसह संयुक्तरित्या कारवाई करत पोलीसांनी मौजा सावंगी रोड येथील ए पी लॉज येथे धाड टाकली असता आरोपी लॉज चा मॅनेजर **आरोपी क्रं १) सेवानंद देवराम गौपाले, वय ३५ वर्ष, रा. मोठा गाव, पोस्ट गरा, बगेडा , जि. भंडारा** हा मिळुन आला. त्याला विचारपुस केली असता लॉज मालकाचे नाव **आरोपी क्रं २). अनिल पुंडलिकराव गुर्जर, वय ६०, वर्ष, रा. वार्ड नं. ०६, कळमेश्वर** असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष हॉटेल ची पाहणी केली असता नमुद हॉटेल मध्ये खोली क्रं ८ मध्ये एक पिडीत महीला मिळुन आली. नमुद पिडीत महीला नागपुर येथुन कळमेश्वरला आल्याची माहीती पोलीसांनी समजली. आरोपी हे स्वत:च्या आर्थिक फायदयाकरिता नमुद महीलेला पैश्यांचे

आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून जागा उपलब्ध करून देवुन तिच्याकडुन देहव्यापार करवुन घेत असल्याची माहीती पिडीतेने पोलीसांना दिली.

**पोलीसांनी घटनास्थळावरून ३ अॅड्रॉईड मोबाईलसह , रोख रक्कम २,००० /— रूपये, आणि इतर साहीत्य असा एकुण १५,३००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच नमुद मिळुन आलेल्या पिडीतेची सुटका करण्यात आली आहे. सदर गुन्हयातील आरोपी क्रं १ आणि २ यांच्या विरूद्ध पोस्टे कळमेश्वर येथे स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक**




## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्री करीता साठवणुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध २ गुन्हे नोंद, ६९ हजार २४८ रूपयांचा मूद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखा आणि नरखेड पोलीस यांची संयुक्त कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ३०/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन नरखेड हद्दीत ग्राम सावरगाव येथे राहुल काशिराम हिरूडकर आणि रंजीत पंजाबराव हिरूडकर यांनी महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखु व गुटखा पदार्थ विक्री करीता साठा करून ठेवला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नरखेड पोलीसांसह संयुक्तीकरित्या कारवाई करत ग्राम सावरगाव येथे आरोपी क्रं १) राहुल काशिराम हिरूडकर याचे घरी धाड टाकली तसेच रंजीत पंजाबराव हिरूडकर याच्या किराणा गोडाऊनवर धाड टाकुन ची पंचासमक्ष झडती घेतली असता दोन्ही ठिकाणी महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु व गुटखा मिळुन आला.

पोलीसांनी घटनास्थळावरून आरोपी क्रं १) राहुल काशिराम हिरूडकर चे घरून ७४.०५१ किलोग्रॅम आणि आरोपी क्रं २) पंचासमक्ष रंजीत पंजाबराव हिरूडकर याचे गोडाउन मधुन २२ किलोग्रॅम असा एकुण ९६.०५१ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु व गुटखा किंमती ६९,२४८/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता. दोन्ही आरोपीतांवर पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम १२३,२७४,२७५,२२३ भा.न्या.संहिता सहकलम अन्न सुरक्षा अणि मानके अधिनियम २००६ प्रत्येकी एक असे दोन गुन्हे नोंद करण्यात आले आहे. दोन्ही आरोपी अटक करण्यात आले आहे.




कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

# २४ तासाच्या आत लोखंडी केबल व्हिल चोरीचा गुन्हा उघड वाहनासह ०५ लाख ०५ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २९/०४/२०२६ रोजी पोलीस स्टेशन मौदा तक्रार प्राप्त झाली की, दिनांक २५/०४/२०२६ ते दिनांक २७/०४/२०२६ रोजी अज्ञात चोरटयांनी नागपूर ते भंडारा रोडलगत असलेल्या मौदा शिवारात विद्युत जोडणी करीता लागणाऱ्या केबल रोलींग व्हिल ०४ नग किंमती ८०,०००/—रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन मौदा येथे चोरीचा गुन्हा नोंद आहे.

मौदा पोलीसांनी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री संतोष गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक ३०/०४/२०२६ रोजी तांत्रिक पुरावे व गुप्त माहितीच्या आधारे **अवघ्या २४ तासाच्या** आत नमुद गुन्हयात **आरोपी नामे १) उमेश रामनारायण शाहु, रा. रामवाडी चौक, इतवारी, नागपुर २) दिपक नारायण पराते, रा. तांडापेठ, नागपुर** यांना नागपुर शहर येथुन ताब्यात घेवुन पोलीसांनी **पंचासमक्ष १) गुन्हयात वापरलेले वाहन एम एच—३४/एम ३०४० २) लोखंड कापण्याकरीता वापरलेले गॅस कटर व सिलेंडर असा एकूण ५,०५,०००/— रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे**. पुढील तपास मौदा पोलीस करीत आहे.




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक ३०/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान** अंतर्गत कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी नितेश राजकुमार गिरी, वय ३५ वर्ष, रा. वार्ड नं. ०४, खापरखेडा ता. सावनेर हा शिव मंदीर समोरील मैदानात कांद्री कन्हान येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच **पोलीस स्टेशन रामटेक** अंतर्गत तहसिल कार्यालयाच्या मागे आरोपी विनोद शिवप्रसाद रंगारी, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र ०५, मनसर ता. रामटेक हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस**

**स्टेशन जलालखेडा** अंतर्गत मौजा इंदरवाडा ता. नरखेड येथे पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी पारेश्वर यशवंतराव नोरोलीया, वय ४९ वर्ष, रा. इंदरवाडा, ता. नरखेड हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कोंढाळी** अंतर्गत तरोडा रोड येथे पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी वसीम इब्राहीम मुसाणी, वय ४१ वर्ष, रा. वार्ड नं. ०९, कोंढाळी हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत संस्कार कॉन्व्हेंट कडील स्मशान भुमीकडे जाणारा रोड येथे पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी लक्की सचिन शिंदेकर, वय २१ वर्ष, रा. मंगळवारीपेठ उमरेड हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** अंतर्गत मौजा भारकस येथे पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी रूपेश चरणदास पायधन, वय २५ वर्ष, रा. बोरगाव निस्ताने, ता. धामनगाव, जि. अमरावती ह. मु गोदावरी कंपनी एमआयडीसी बोरी ता. हिंगणा, जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत मौजा बोरखेडी रेल्वे येथे पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी अंतरीक्ष गणेश पुसदकर, वय २१ वर्ष, रा. सिंधी रेल्वे मेघा, जि. वर्धा हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ०७ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २४ गुन्हे नोंद

दिनांक ३०/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ११,२३०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन वेलतूर** अंतर्गत ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन पाचगाव येथे** ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कुही** येथे ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन उमरेड**

येथे ०३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल येथे** ०५ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड येथे ०१** गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापा** येथे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन केळवद** येथे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बोरी** येथे ०१ गुन्हा नोंद आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) २२ लिटर मोहाफुल गावठी दारू २) १३५०० मिली देशी दारू असा एकुण ११,२३०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने